*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

NAVJYOT /Vol. IX / Issue – I ISSN 2277-8063

# डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळातील भारताचे महासत्तांशी संबंध

**प्रा.डॉ.रविंद्र पांडुरंग भणगे, विभाग प्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

---

**प्रस्तावना :**

भारताचे परराष्ट्र धोरण व भारतीय नागरिकांच्या इच्छा-अपेक्षा यांचा जवळचा संबंध गेल्या ६५ वर्षांत तयार झाला आहे. २००४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर २०१४ पर्यत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी लोकहित आणि परराष्ट्र धोरण यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला, शिवाय शेजारील देश व एकंदरीत आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची प्रतिमा मलिन होऊ दिली नाही. परराष्ट्र खात्यातील ज्येष्ठ अधिकाऱ्यांना संबोधित करताना डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या परराष्ट्र राजकारणातील पाच मूलभूत तत्त्वे स्पष्ट केली. यूपीए सरकारच्या कार्यकाळात भारताने आपल्या सहकारी आणि मित्र देशांशी संबंध अधिक सलोख्याचे व शांततापूर्णठेवण्याचा प्रयत्न केला. सुमारे ६० वर्षांपूर्वी पंडित नेहरूंनी बांडुंग येथील परिषदेत पंचशील तत्त्वांची मांडणी केली होती त्याच अनुषंगाने डॉ मनमोहन सिंग यांनी अधोरेखित केलेल्या पाच तत्त्वामध्ये देशाच्या प्रगतीसाठी आंतरराष्ट्रीय परिस्थिती भारतासाठी अनुकूल करणेजेणेकरून परदेशात राहणाऱ्या भारतीयांना सुरक्षा मिळेल व त्यांच्या प्रगतीला हातभार लागेल, जगाच्या आर्थिक प्रगतीमध्ये भारताचा अधिकाधिक सहभाग वाढवणे, आपल्या शेजारील देशांशी इतर महासत्तांशी स्थिर-दीर्घकालीन-सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणे आणि या देशांच्या मदतीने आंतरराष्ट्रीय समुदायात आर्थिक विकास व सुरक्षितता याबद्दल प्रयत्न करणे, क्षेत्रीय संघटन शक्तीवर भर देणे व लोकशाही संस्था सक्षम करणे आणि भारताची विविधता, धर्मनिरपेक्ष व उदारमतवादी लोकशाही मूल्यांची परराष्ट्र धोरणाशी सांगड घालणेयाचा सामावेश असून या पंचतत्त्वात अभिमान किंवा अभिनिवेश नाही, तर त्यामागे वास्तवाचे भान असल्याचे स्पष्ट होते. 'इकॉनॉमिस्ट' या नियतकालिकाने डॉ. मनमोहन सिंग यांच्या नऊ वर्षांच्या काळातील परराष्ट्र धोरणाचा आढावा घेताना त्यांच्या संयमी, दूरदर्शी, द्रष्टेपणाबद्दल प्रशंसा केली आहे रशिया, चीन, जपान, जी-२० देशांचा समूह, अमेरिका, आसियान, मध्य पूर्व आशियातील देश, दक्षिण आशिया यांच्याशी डॉ. मनमोहन सिंग यांनी केवळ आर्थिक संबंध दृढ केले नाहीततर या देशांशी सुसंवाद व मैत्रीचे-सलोख्याचे संबंध दृढ केलेले आहे असे या नियतकालिकात म्हटले आहे. नव्वदच्या दशकात भारताला जागतिकीकरणाच्या पर्वात नेण्याचे महान कार्य डॉ. मनमोहन सिंग यांनी अर्थमंत्रीपदी असताना केले होते. त्या वेळी त्यांच्यावर भाजपबरोबरच डाव्यांनी, समाजवाद्यांनी कठोर टीका केली होती. स्वकीयांचाही विरोध त्यांनी पत्करला होता. पण हे सर्व राजकीय अडथळे पार करत त्यांनी देशामध्ये प्रगतीचा विश्वास निर्माण केला होता. भारत जगात एक सामर्थ्यशाली देश होऊ शकतो असा आत्मविश्वास निर्माण केला होता. अशा पद्धतीच्या पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग भारतीय परराष्ट्र धोरणाला नवीन आयाम निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**संपुआ सरकारचे पराष्ट्र धोरण व किमान समान कार्यक्रम :-**

संयुक्त लोकशाही आघाडीची स्थापना करताना त्या आघाडीत सामील झालेल्या सर्व राजकीय पक्षांनी एक किमान समान कार्यक्रम तयार केला होता. संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकारकडून किमान समान कार्यक्रमाच्या आधारे शासन केले जावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. संयुक्तपुरोगामी आघाडीच्या संयुक्तकार्यक्रमात परराष्ट्र धोरणाला देखील महत्त्वाचे स्थान देण्यात आले होते. विशेषता आघाडीतील डावे पक्ष त्यासंबंधी विशेष आग्रही होते. पुरोगामी आघाडी सरकारने खऱ्याखुऱ्या अलिप्ततावादाचा अंगीकार करावा असे त्यात स्पष्ट करण्यात आले. भारतातील डावे पक्ष आणि आघाडीतील आणखीही काही प्रमुख घटक पक्ष यांचा अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील शासनाने स्विकारलेल्या परराष्ट्र धोरणावर आक्षेप होता. ज्यात या शासनाने अमेरिकेला अनुकूल ठरणाऱ्या धोरणांचा केलेला अवलंब यामुळे "अलिप्ततावादी देश" या भारताच्या आजवरच्या प्रतिमेला धक्का पोहचला याबद्दल त्यांची नापसंती होती. यामुळेच पुरोगामी आघाडी सरकारने वाजपेयी सरकारच्या परराष्ट्र धोरणाचा त्याग करावा असा आग्रह आघाडीतील डाव्या पक्षांचा होता. संयुक्त पुरोगामी आघाडीतील डाव्या पक्षांचा सहभाग त्यांचा पुरोगामी आघाडी सरकारला असलेला बाहेरून पाठींबा आणि किमान समान कार्यक्रमात अलिप्ततावादी धोरणाचा करण्यात आलेला पुरस्कार यामुळे नवेसरकार अमेरिकावादी धोरणे स्विकारणार नाही अशी अपेक्षा व्यक्त केली व नव्या सरकारच्या कारकिर्दीत भारत व रशिया यांच्यातील मैत्री आणखी भक्कम होईल असे गृहीत धरण्यात आले.

**पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे परराष्ट्र धोरणातील पंचसूत्रे :-**

भारतीय परराष्ट्र धोरणाची एकविसाव्या शतकात आधारभूत तत्त्व आणि उद्दिष्ट असावीत या विषयी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी पंचसूत्रीची घोषणाकेली. या पंचसूत्री मध्ये पुढीलप्रमाणे तत्त्वे समाविष्ट असलेली दिसतात

- भारताच्या आर्थिक विकासाला पूरक अशी आंतरराष्ट्रीयपरिस्थीती विकसित करणे.
- बड्या राष्ट्रांबरोबर स्थिर आणि दीर्घकालीन सहकार्याचे संबंध प्रस्थापितकरणे.
- जागतिक पातळीवरील आर्थिक विकासात भारताचा सहभाग वाढविणे.
- विभागीय पातळीवर सहकार्य वाढविण्यासाठी क्षेत्रीय संघटनांचे सबलीकरण घडवून आणणे.
- बहुलतावाद, धर्मनिरपेक्षता आणि उदारमतवादी लोकशाही या मूल्यांच्या आधारावर भारताच्या आर्थिक हितसंबंधाची जोपासना करणे.

या पद्धतीने पाच तत्त्वांचा समावेश पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी भारतीय परराष्ट्र धोरण निर्माण करताना विचारात घेतली व यानुसार भविष्यकालीन उद्दिष्टे अधोरेखित केलेली दिसतात. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या या धोरणात नागरिकांच्या आर्थिक इच्छा व त्याच्या हितसंबंधाचे रक्षण यात दिसून येते त्यांनी जनहित आणि परराष्ट्र धोरण यांच्यात सांगड घालण्याचा प्रयत्न केला. ही पंचसूत्री वास्तववादावर आधारित असून यात विचारसरणी ऐवजी हितसंबंधाला महत्व दिले गेले पंतप्रधान मनमोहनसिंग यांची पंचसूत्री तीन आधार असल्याचे दिसते

- भारताला सध्या प्राप्त होत असलेला आंतरराष्ट्रीय सन्मान भारताच्या आर्थिक प्रगतीमुळे आहे.
- आर्थिक प्रगतीमुळे भारताला जागतिक पातळीवर नवीन संधीप्राप्त झाल्या आहेत.
- आर्थिक प्रगतीमुळे भारताचे अमेरिका, रशिया, चीन, जपान यांसारख्या महासत्तांबरोबर संबंध सुधारलेआहेत.

परिणामी अशा आर्थिक प्रगतीत सातत्य ठेवणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून निर्माण करता येते. या धोरणात दोन भूमिका दिसत असतात.

- मोठ्या राष्ट्रांबरोबर संबंधघनिष्ठ करून भारताचे आर्थिक हितसंबंध जोपासायचे आहे
- क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया वृद्धिंगत कशी होईल यासाठी प्रयत्न करायचे आहे. या आर्थिक एकीकरणातून भारताला विकासाची नवी संधी निर्माण करायची आहे (देवळाणकर, (२०१४) :३८,३९)

अशा प्रकारे पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे परराष्ट्र धोरण हे आदर्शवाद व वास्तववाद यांच्यातील समतोल साधणारे असल्याचे दिसते. त्यांच्या मते आर्थिक विकास हे भारताचे मुख्य उद्दिष्ट असले तरी हा आर्थिक विकास उदारमतवादी, लोकशाहीच्या आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांच्या चौकटीतच व्हायला हवा असा त्यांचा आग्रह होता. याच मूल्यांच्या आधारावर भारताने द्विपक्षीय तसेच बहुक्षीय पातळीवर आपले संबंध इतर राष्ट्रांबरोबर, संघटनाबरोबर विकसित करावे असे त्यांचे मत असल्याचे दिसते. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी परराष्ट्र धोरणात आर्थिक विकास, जनहित, भारतातील घटनात्मक मूल्ये, नागरिकांमधील संवाद, सहकार्य अशा विविध घटकांना एकत्र आणण्यावर अधिक भर देत असल्याचे दिसून येते.

**डॉ.मनमोहन सिंग यांचे "परराष्ट्र धोरणातील पंचसूत्री" च्या अंमलबजावणीत अडचणी :-**

पंतप्रधान मनमोहन सिंग यांची पंचसूत्री भारतीय परराष्ट्र धोरण आदर्शवादी असली तरी त्याच्या काळात देशांतर्गत परिस्थिती या पंचसूत्रीच्या अंमलबजावणीसाठी पोषकनव्हती. त्यामुळे परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत विचित्र परिस्थिती निर्माण झालेली दिसते. त्यामुळे परराष्ट्र धोरणाबाबत नकारात्मक प्रवाह निर्माण झालेला दिसतो. परराष्ट्र धोरण ठरविणे हा केंद्र शासनाच्या अधिकाराचा भाग असला तरी भारतातील काही प्रादेशिक पक्ष परराष्ट्र धोरण ठरविण्यात सक्रिय झाले असून ते परराष्ट्र धोरणातील अनेक संवेदनशील प्रश्नांवर आपली बाजू केंद्र शासनावर लादण्यासाठी दबावतंत्राचा वापर करत आहेत व स्वतंत्र परराष्ट्र धोरण विकसित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास येते. भारतात केंद्र सरकारची आणि घटक राज्यांची अशी दोन वेगळी परराष्ट्र धोरणे निर्माण झाल्याचे धोकादायक चित्र पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या काळात निर्माण झालेले दिसत होते. तामिळनाडू मधील डीएमके,अण्णा द्रमुक आणि पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस या पक्षांनी स्वतंत्र परराष्ट्र धोरणे आखली असून ती दबावतंत्राच्या माध्यमातून केंद्र शासनावर लादण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत होते. यात विशेष करून शेजारील राष्ट्राबाबतचे भारताचे परराष्ट्र धोरण प्रभावित झाले आहे. श्रीलंका आणि बांगलादेशाविषयी धोरण ठरवणे आपल्याला अवघड होऊन बसले आहे. परराष्ट्र धोरण हे प्रादेशिक पक्षांच्या इच्छेवर नाही तर राष्ट्रीय हितसंबंधांवरआधारित

असावे. विशिष्ट भाषिक समूहाच्या अस्मितीचे परराष्ट्र धोरण नसून ते भारतीय नागरिकांच्या इच्छाचे प्रतिबिंब असावे यामुळे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे 'परराष्ट्र धोरणातील पंचसूत्री' च्या अंमलबजावणीतील अडचणी निर्माण झालेल्या दिसतात.

भारत व अमेरिका यांच्या **परराष्ट्र धोरणाला कलाटणी व अणुकरार :-**

भारत व अमेरिका यांच्यातील राजनयिक संबंधाचा विचार करता पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळात संबंध उत्तरोत्तर अधिकच दृढ होत गेलेले दिसतात. याचे महत्वाचे कारण भारत व अमेरिका दरम्यान झालेल्या अणु सहकार्याचा करार होय. काही वर्षांपूर्वी भारताने अणुचाचण्या घेतल्याबद्दल अमेरिकेने भारतावर आर्थिक निर्बंध लादलेले होते आणि आता अमेरिका भारताशी अणु सहकार्य करण्यास तयार होणे हे भारत-अमेरिकेच्या संबंधाचे बदलते स्वरूप असल्याचे दिसते. भारत व अमेरिका याच्यातील अणुसहकार्य कराराची पार्श्वभूमीवर भारतीय पंतप्रधानांच्या अमेरिका भेटीत तसेच अमेरिकन अध्यक्षाच्या भारत भेटी दरम्यान तयार झाली होती. पुढे अमेरिकेच्या काँग्रेसने नोव्हेंबर २००६ मध्ये या कराराला मान्यता दिली. भारताच्या मंत्रीडळाने जुलै २००७ मध्ये त्या कराराला मान्यता दिली. अशा प्रकारे दोन्ही देशांतील अणुसहकार्य कराराचा मार्ग सुकर झाला या करारामुळे अमेरिकेने भारताला अणु इंधनाचा पुरवठा करण्यास तसेच नागरी क्षेत्रात अणुतंत्रज्ञान पुरविण्यास मान्यता दिली. भारताने आण्विक प्रसार करारावर सही केली नसली तरी अणुसहकार्याचे करार करण्यासही अमेरिकेने मान्यता दिली. यामुळे भारताला इतर देशांशी करार करण्याचा मार्ग खुला झाला. पण या करारानुसार भारताने ही भारतातील नागरी अणुभट्ट्यावर आंतरराष्ट्रीय अणुउर्जा प्राधिकरणामार्फत घातली जाणारी बंधने स्विकारण्यास मान्यता दिली

२००८ साली बराक ओबामा यांनी अमेरिकन अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी भारतासमवेत घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्यास अमेरिका वचनबद्ध असल्याचे स्पष्ट केलेले असून त्याच बरोबर दक्षिण आशियायी संदर्भात दोन खालील उद्दिष्टांना प्राधान्य दिले गेले

- दक्षिण आशियायी विभागाताल सत्ता समतोल टिकवणे
- भारत व पाकिस्तान यांच्यातील परस्पर संबंधांत सुधारणा घडवून आणणे

ओबामा यांच्या काळात भारत व अमेरिका यांच्या परराष्ट्र धोरणात खालील मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी असलेले दिसतात.

- अणुशक्ती
- रिटेल मार्केटींग
- विमा क्षेत्रातील सुधारणा
- शस्त्रखरेदी (देवळाणकर, (२०१४):५४)

भारत व अमेरिका यांच्या परराष्ट्र धोरणात वरील विषयांना महत्व होते. या वेळी अमेरिकेमध्ये आर्थिक मंदी आल्याने हजारो लोक बेरोजगार झाले होते. तेथे १० टक्के बेरोजगारीचा दर निर्माण झालेला होता. अशा वेळी भारतीय बाजारपेठ, विमा क्षेत्र, शस्त्र खरेदी तसेच आण्विक इंधन ही अशी क्षेत्रे आहेत की, ज्यामधून अमेरिकेला आर्थिक नफ्याच्या मोठ्या संधी निर्माण होणार होतील. त्यामुळे अमेरिका भारतावर घाऊक बाजारपेठ सुधारणा, विमा सुधारणा तसेच आण्विक दायित्व बिल भारतीय संसदेने लवकरात लवकर मंजूर करावे यासाठी दबाव टाकत असल्याचे दिसून आले. भारताबरोबर विविध क्षेत्रामधून होणाऱ्या व्यापार करारांद्वारे अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्यानेच २०१० मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या भारत भेटीदरम्यान भारत व अमेरिकेमध्ये १२ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे करार मंजूर करण्यात आलेले दिसतात. त्यामुळे अमेरिकेत ६० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याची शक्यता होती तसेच अमेरिका व भारत या देशादरम्यान एकूण १० अब्ज अमेरिकन डॉलर्सचे वीस करार संमत झाले. तसेच अमेरिकेची "बोईंग' कंपनी व स्पाईस जेट' दरम्यान ७३७ जातीच्या ३३ विमान खरेदीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. त्याचबरोबर भारत व' अमेरिका देशादरम्यान 'अणुइंधन पुनर्प्रक्रिया करार' करण्यात आला आहे. या करारामुळे भारतातील अणुभट्ट्यांमध्ये वापरण्यात आलेल्या अणु-इंधनावर प्रकिया करणे तसेच त्याचे समृद्धीकरण करणे शक्य होणार आहे. या करारावर अमेरिकेचे परराष्ट्र राज्यमंत्री विल्यम बर्न्स व अमेरिकेतील भारताच्या राजदूत मीरा शंकरयांनी ३१ जुलै २०१० रोजी स्वाक्षऱ्या केल्या. दोन्ही देशांमध्ये नागरी अणुउर्जा सहकार्य करार अंतिम टप्प्यात मानला गेला. याचबरोबर २३ जुलै २०१० काऊन्टर टेररिझम कोऑपरेशन इनशिएटीव्ह करार भारत व अमेरिका या देशादरम्यान करण्यात आला या करारावर अमेरिकेचे भारतातील तत्कालीन राजदूत टिमोथी रेमर व भारताचे तत्कालीन गृहसचिव जी के .पिल्लई यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

ज्याप्रमाणे अमेरिकेला आर्थिक व संरक्षण क्षेत्रात भारताबरोबर मैत्रीची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे भारताला चार क्षेत्रांमध्ये अमेरिकेची मदत हवी असल्याचे निदर्शनास येते.

- अमेरिकन भांडवल
- अमेरिकन तंत्रज्ञान
- अमेरिकन तज्ञ
- आशिया खंडातील सत्ता समतोल

भारताच्या आर्थिक आणि संरक्षण हितसंबंधाची पूर्तता तेव्हाच होऊ शकते जेव्हा आशिया खंडातील सत्ता समतोल टिकून राहील. पण चीनच्या वाढत्या विस्तारवादी आणि आक्रमक धोरणांमुळे आशिया खंडातील सत्ता समतोल धोक्यातआला होता. आशिया खंडातील सत्ता समतोल टिकवण्यासाठी अमेरिकेचे आशिया खंडातील वास्तव्य आवश्यक आहे. त्यामुळे भारत व अमेरिका संबंध घनिष्ट होण्यात दोघांचाही फायदा आहे. कारण यात दोन्ही देशांच्या हितसंबंधाची व्यापकता दिसून येते. या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणाची चार प्रमुख उद्दिष्टे होतीत्यामध्ये

- समुद्री मार्गाचे संरक्षण
- इंधन सुरक्षा
- दक्षिण आशियातील शांतता, सुरक्षता व राजकीय स्थैर्य
- चीनच्या वाढत्या विस्तारवादी सामर्थामुळे सत्ता समतोल साधणे

ही चारही उद्दिष्टे अमेरिकेच्या मदतीने भारताला साधता येण्यासारखी आहेत. अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंध घनिष्ठ होण्यासाठी या दोन्ही राष्ट्रांना आर्थिक तसेच राजकीय, संरक्षण क्षेत्रात काही धाडसी पावलांची आणि त्यागाची आवश्यकता असल्याचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग व अमेरिकन अध्यक्ष बराक ओबामा यांच्या काळातील परराष्ट्र धोरण दिसून आले. (देवळाणकर, (२०१४) :५४,५५)

अमेरिकेत २०१३ मध्ये पार पडलेल्या सत्तावण्णाव्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विद्यमान राष्ट्राध्यक्ष बरक ओबामा यांची पुनर्निवडझाली. त्यांचे अध्यक्षपदाचे दुसरे पर्व सुरूझाले होते. यात अमेरिकेच्या आशिया खंडाविषयीच्या नवीन धोरणात दक्षिण आशियाला केवळ प्राधान्यच नाही तर केंद्रबिंदू बनविलेजाईल असे घोषित करण्यात आले. भारत व अमेरिका यांच्या परराष्ट्रधोरणात पुढील प्रमुख मुद्दे महत्वपूर्ण असल्याचे दिसून येतात.

१. आण्विक उत्तरदायित्वाचा मुद्दा
२. भारतातील घाऊक बाजारपेठेतील गुंतवणुकीचा मुद्दा
३. भारतातील विमा क्षेत्रात सुधारणा
४. गुंतवणुकीचा प्रश्नआणि संरक्षणविषयक खरेदी या मुद्यांचा समावेश

याशिवाय अफगाणिस्तान आणि इराण या प्रश्नावर अमेरिकेला भारताचे सहकार्य अपेक्षित आहे. आर्थिक सुधारणाच्या कार्यक्रमाला चालना देण्यासाठी तसेच विविध विभागीय पातळीवरील संरक्षणविषयक आणि राजकीय स्वरूपाच्या प्रश्नावर भारताचे सहकार्य प्राप्त करण्यासाठी ओबामा प्रशासनाने भारताबरोबर नियमित चर्चा, संवाद आणि माहितीच्या हस्तांतरणावर भर दिलेला दिसतो.

**भारत - रशियाच्या परराष्ट्र धोरणात सहकार्याचे व विश्वासाचे वातावरण :-**

रशियाच्या अध्यक्ष पुतीन यांनी अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरसन २००० पासून चार वर्षांत तीन वेळा त्यांनी भारताला भेट दिली होती. २००४ च्या शिखर परिषेदत सहभागी होण्यासाठी भारत भेटीवर आले असता पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग काळातील ४ भेट होती. यामुळे भारत व रशिया यांच्यातील वाढत्या मैत्री विश्वासाच्या वातावरणात अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते. यातून रशिया आपल्या परराष्ट्र धोरणात भारताला महत्व देत असल्याचे दिसून येते. अध्यक्ष पुतीन यांनी तीन दिवसाच्या भारत दौऱ्यात दोन्ही नेत्यांनी भारत व रशिया यांच्यातील सध्याचे मित्रत्वाचे संबंध व परस्पर सहकार्य याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच दोन्ही देश भविष्यकाळात परस्परांचे निकटचे मित्र म्हणून राहतील असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी भारत व रशिया यांच्यातील मैत्री परस्पर विश्वासावर आधारित असून ती काळाच्या कसोटीवर पूर्णपणे उतरली आहे असे प्रतिपादित केले. तसेच पुतीन यांनीही भारत व रशिया यांची मैत्री उत्तरोत्तर वाढत जाईल असा विश्वास व्यक्त केला.

भारत व रशिया यांच्यात मॉस्को येथे होणाऱ्या सहाव्या वार्षिक शिखर परिषदेत भाग घेण्यासाठी भारताचे पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग डिसेंबर २००५ मध्ये रशियाच्या दौऱ्यावर गेले असता. या परिषदेत प्रामुख्याने विविध विषयांवर विस्ताराने चर्चा करण्यात आली. त्यामध्ये अणुऊर्जा संबंधीच्या प्रश्नाला विशेष प्राधान्य देण्यात आले होते. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्यातील जुलै २००५ च्या भेटीदरम्यान भारत व अमेरिका यांच्यात अणु सहकार्याच्या कराराला अनुकूलता दर्शविण्यात आली होती. त्यामुळे भारत व रशिया यांच्यातील अणुसहकार्याच्या प्रश्नालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. या अणुसहकार्याच्या माध्यमातून रशियाने तमिळनाडू राज्यातील कुडनकुलम येथील अणुऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीस सहकार्य केले होते. त्यामध्ये भारताला १,००० मेगावॅट शक्तीचे दोन रियाक्टर पुरविले होते. यासारखे आणखी अणुऊर्जा प्रकल्प उभारणीचे नियोजन भारत सरकारने केले होते. या प्रकल्पाला रशियाकडून मदत मिळावी यासाठी भारताकडून प्रयत्न केला गेला होता व त्याला यश ही आले आणि सहाय्य करण्याचे आश्वासन रशियाने दिलेले दिसून येते.

तसेच दोन्ही देशामध्ये सहकार्याच्या प्रश्नावरही बोलणी झाली दोन्ही देशांनी संरक्षणाच्या क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविण्याची तयारी दर्शविली त्यानुसार दोन्ही देशांनी आपल्या सैनिकी तांत्रिक सहकार्याविषयक दहा वर्षांच्या कार्यक्रमात आवश्यक ते बदल घडवून आणण्यास आणि त्या अंतर्गत नव्या शस्त्रास्त्रांचे उत्पादन करण्याच्या प्रक्रियेस चालना देण्यास संमती दिली. तसेच पाचव्या पिढीतील लढाऊ विमाने विकसित करण्याच्या मुद्द्यावरही या वेळी चर्चा करण्यात आली दोन्ही राष्ट्राच्या राष्ट्र प्रमुखांच्या दौऱ्यामुळे दोन्ही देशांच्या परराष्ट्र धोरणात मैत्रीचे व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले यामुळे दोन्ही देशातील परराष्ट्र धोरणात आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारत व अमेरिका यांच्या संबंधाचा प्रभाव पडला नाही याउलट दोन्ही देशाच्या संबंधात विश्वास निर्माण झाला.

**भारत व रशिया यांच्यात परराष्ट्र धोरणात संरक्षण, आर्थिक व व्यापारी सहकार्य :-**

भारत व रशिया यांच्यातील आर्थिक व व्यापारी सहकार्याच्या प्रश्नावर बोलताना पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी स्पष्ट केले की, दोन्ही देशाच्या दरम्यान आर्थिक व व्यापारी सहकार्या संबंधीचा व्यापक करार करण्याची शक्यता तपासून पाहण्यासाठी एका संयुक्तकृतिदलांची स्थापना करण्यात येईल. तसेच भारताच्या पंतप्रधानांनी या वेळी असे आश्वासन दिले की, रशियाला जागतिक व्यापार संघटनेत प्रवेश मिळवून देण्यासाठी भारत प्रयत्न करेल आणि रशियाच्या त्या संघटनेतील प्रवेशाला भारताचा पूर्ण पाठिंबा राहील याचप्रमाणे भारत व रशिया यांनी अवकाश क्षेत्रातील सहकार्याबद्दल महत्त्वपूर्ण करार केला गेला. यामुळे भारताच्या अवकाश संशोधनाला चालना मिळालेली दिसून येते.

पंतप्रधान मनमोहन सिंग व अध्यक्ष पुतीन यांच्यातील या शिखर परिषदेला भारत व अमेरिका यांच्यातील अणुसहकार्य कराराचा संदर्भ लाभला होता. अमेरिकेबरोबर २००५ झालेल्या अणुसहकार्य करारामुळे या दोन्ही देशाच्या परराष्ट्र धोरणावर संशयाचे वातावरणा निर्माण झाले होते. पण दोन्ही देशाच्या परस्पर विश्वास व सहकार्याच्या वातावरणामुळे या दोन्ही देशाच्या संबंधावर प्रभाव निर्माण झाला नाही. उलट भारत व रशिया यांच्या सहकार्य भविष्यकाळात वाढलेले दिसते.

- भारत व रशिया यांच्यातील परस्पर परराष्ट्र धोरण हे फायदा आणि हितसंबंधाच्या व्यापकतेवर आधारित आहे यामध्ये अफगाणिस्तान, इंधन व उर्जा, संरक्षण साहित्य आणि दहशतवाद या विषयावर आधारित आहे.
- २००१ नंतर रशियाच्या परराष्ट्र धोरणात भारताचे महत्व वाढत असल्याचे दिसून येते व पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळात विविध स्तरांवर सहकार्याचे व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले . रशियाने भारताशी विना अट केलेला अणुसहकार्य करारामुळे अमेरिकेपेक्षा भारत व रशिया यांच्या परराष्ट्र धोरणात विश्वास निर्माण झाला.
- भारताची वाढती इंधन व संरक्षणाच्या गरज पुर्तेतेसाठी व मध्य आशियातील राष्ट्राबरोबर संबंध सुधारण्यासाठी भारताच्या परराष्ट्र धोरणात रशियाची भूमिका महत्वाची ठरली.
- रशियाने नेहमीच भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिकेचे समर्थन केलेले दिसून येते

**पंतप्रधान मनमोहन सिंग यांची चीन बाबतच्या परराष्ट्र धोरणाबाबत अष्टपैलू :-**

भारताच्या आर्थिक विकासापुढे जी आव्हाने उभी आहेत त्यातच भारत-चीन सहकार्याच्या संधी उपलब्ध असल्याचे डॉ मनमोहन सिंग यांचे मत होते. डॉ. सिंग यांनी चीन बाबतच्या परराष्ट्र धोरणात द्वी-पक्षीय सहकार्याची ८ क्षेत्रे सूचित केली आहेत.

▪ भारताने नजीकच्या भविष्यात एकूण १ ट्रीलीयन डॉलर्सची गुंतवणूक पायाभूत सुविधांच्या विकासात करण्याची योजना आखली आहे. चीनचा पायाभूत सुविधांच्या विकासातील अनुभव बघता गुंतवणुकीच्या माध्यमातून भरीव सहकार्यास प्रचंड वाव आहे.

- दोन्ही देशांमध्ये शहरीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. शहरीकरणातून निर्माण होणारी आव्हाने आणि समस्या सोडवण्यासाठी दोन्ही देशातील योजनाकार, प्रशासक व उद्योजक यांनी एकत्र येऊन अनुभवांची व तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करणे परस्पर हिताचे आहे.
- औद्योगिक उत्पादन हे चीनचे शक्तिस्थान आहे तर सेवा क्षेत्रातील विकासात भारताने आघाडी घेतलेली आहे. कामगारांच्या कौशल्य विकासात भारताला बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. या दृष्टीने औद्योगिक व सेवा क्षेत्रातील परस्पर सहकार्य दोन्ही देशांना हितकारक ठरणारे आहे.
- दोन्ही देशांमध्ये उर्जेचा वापर सतत वाढत आहे. ऊर्जा गरजांची पूर्तता करण्यासाठी संयुक्तपणे प्रयत्न केल्यास कमी गुंतवणुकीत जास्त यश हाती येईल. विशेषत: अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा विकास करण्यासाठी तसेच तिसऱ्या देशाकडून मदत घेण्यासाठी दोन्ही देश सहकार्य करू शकतात.
- वाढती लोकसंख्या, उद्योगासाठी शेतजमिनीची आवश्यकता, सतत उंचावणारे राहणीमान आणि मुक्त अर्थव्यवस्थेतील किंमतीतील चढ-उतार यामुळे अन्न-सुरक्षा हा दोन्ही देशांसाठी महत्वाचा मुद्दा आहे याबाबतीत दोन्ही देश एकमेकांच्या अनुभवातून आणि एकमेकांकडे उपलब्ध तंत्रज्ञानातून लाभान्वित होऊ शकतात.
- मुक्त जागतिक अर्थव्यवस्थेचा आणि नियमाधारीत जागतिक व्यापाराचा सर्वाधिक लाभ भारत आणि चीन ने उचलला आहे. मात्र, सन २००८-०९ च्या भांडवलशाही देशातील आर्थिक संकटामुळे पाश्चिमात्य जगताचा कल संरक्षित अर्थव्यवस्थेकडे वळू लागला आहे. यातून क्षेत्रीय आर्थिक गटांना प्राधान्य देण्यात येत असले तरी त्यांचे मुक्त जागतिक अर्थव्यवस्थेत विलीनीकरण न करण्याचे धोरण अंमलात येत आहे. याउलट क्षेत्रीय आर्थिक गटांच्या विकासातून मुक्त अर्थव्यवस्थेस चालना देणे भारत आणि चीनच्या हिताचे आहे. ब्रिक्सच्या माध्यमातून दोन्ही देशांनी उचललेली पाउले आणखी पुढे नेणे गरजेचे आहे.
- आर्थिक विकासातून गरीबी निर्मुलनास प्राधान्य देताना हवामान बदलासंदर्भात जागतिक दबावाचा सामना एकत्रितपणे करणे संयुक्तिक आहे दोन्ही देशांच्या प्राचीन संस्कृतींमध्ये पर्यावरणास मानाचे स्थान आहे मात्र हवामान बदल थांबवण्याचा मोठा भार विकसित देशांना उचलावा लागणे नैतिक आणि नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने संयुक्तिक आहे त्यामुळे हवामान बदल थांबवण्यासाठी 'सर्वांनी पण वेगवेगळया प्रमाणात जबाबदारी उचलण्याच्या' तत्वाचा भारत आणि चीनने जोरदार पुरस्कार करणे क्रमप्राप्त आहे.
- शीत-युद्धोत्तर काळात साधारणपणे दोन्ही देशांनी आंतरराष्ट्रीय शांततेचा अनुभव आला आहे. मात्र आपापल्या सीमारेषेवरील तुलनात्मक शांतता कायम राखण्यासाठी दोन्ही देशांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे दोन्ही देशांच्या राष्ट्रीय एकता आणि अखंडतेबाबतच्या समस्या कमी-अधिक प्रमाणात एक सारख्या आहेत. शेजारच्या देशातून उगम पावणारा दहशतवाद आणि धार्मिक कट्टरतेचा दोन्ही देशांना धोका आहे. तसेच पश्चिम आशियात शांतता नांदणे हे दोन्ही देशांच्याऊर्जा गरजांची पूर्तता होण्यासाठी आवश्यक आहे. या दृष्टीने दोन्ही देशांनी समान आंतरराष्ट्रीय भूमिका विकसित केल्यास आर्थिक विकासासाठी आवश्यक शांततामय जागतिक वातावरण निर्माण होण्यास मदत मिळू शकेल. भूखंडीय आशिया प्रमाणे सामुद्रिक आशिया-पॅसिफिक क्षेत्रात सौहार्दाचे वातावरण टिकवणे दोन्ही देशांच्या आंतराराष्ट्रीय व्यापारासाठी हितावह आहे.

सहकार्याचे हे अष्टपैलू प्रत्यक्षात आणण्यासाठी पंतप्रधान डॉ. सिंग यांनी द्विपक्षीय संबंधाची सात तत्वे अधोरेखित केली होती.

- आजच्या काळानुसार पंचशीलची पुर्नव्याख्या करत परस्पर विश्वास, एकमेकांच्या कळीच्या मुद्द्यांबाबतची संवेदनशीलता आणि सर्व द्विपक्षीय तंटे चर्चा व वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवण्याची कृतसंकल्पता यावर भारत-चीन संबंध आधारलेले असावेत.
- प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील शांतता कायम राखत सीमा प्रश्न सोडवण्याच्या दिशेने दोन्ही देशांनी वेगाने वाटचाल करावी.
- दोन्ही देशातील सामरिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी नद्याचे अखंडीत प्रवाह तसेच व्यापारातील तुट यासारख्या मतभेदाच्या मुद्द्यांवर भारत व चीन दरम्यान सखोल चर्चा व्हावी.
- दोन्ही देशामधील अविश्वासाचे आणि गैर-समजुतीचे वातावरण दूर करण्यासाठी उच्च स्तरावरील संवाद व सल्ला मसलतीत सातत्य राखावे.
- जागतिक स्तरावर दोन्ही देशाच्या बहुतांश भूमिका समान असल्याने त्याच आधारे क्षेत्रीय आणि बहुराष्ट्रीयव्यासपीठांमध्ये राजकीय, आर्थिक व संरक्षण बाबतीत सहकार्य करावे.

- आर्थिक बाबींसह सर्व क्षेत्रांमध्ये संबंध बळकट करण्याच्या दिशेने प्रयत्न करावे
- दोन्ही देशातील विविध क्षेत्रातील मान्यवरांमध्ये संपर्क आणि सहकार्य वृद्धिंगत करावेत

पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी आपल्या अखेरच्या चीन दौऱ्यादरम्यान चीनच्या साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीच्या प्रशिक्षण केंद्रात केलेल्या भाषणात या अष्टपैलू सप्तपदीची मांडणी केली होती. यावेळी चीनच्या साम्यवादी पक्षातील ५०० हून अधिक नेते हजर होते. द्वि-पक्षीय संबंधाची ही अष्टपैलूसप्तपदी मांडताना डॉ. सिंग यांनी चीनला नव्या युगाची जाणीव करुन दिली. या युगात शीत-युद्ध काळातील परस्परांची घेराबंदी करण्याचे सामरिक तत्वज्ञान अनुपयोगी असून जागतिक राजकारणात त्यास तिलांजली देण्याची गरज असल्याचे सांगितले. चीनच्या जवळील शेजारी देशांशी भारताचे संबंध हे केवळ आपल्या आर्थिक विकासासाठी आहेत आणि कोणत्याही प्रकारे त्याद्वारे चीनची कोंडी करण्याच्या प्रयत्नात भारत सहभागी नाही. त्याच प्रकारे चीनने सुद्धा भारताच्या शेजारी देशांशी संबंध विकसित करताना भारतविरोधी आघाडी तयार करण्याच्या प्रयत्न करू नये. एकमेकांच्या विरोधात आघाड्या उभारण्यात वेळ व क्षमता खर्च करण्यापेक्षा परस्पर सहकार्याने द्वी-पक्षीय संबंध विकसित करण्याचे लाभ कितीतरी जास्त आहेत. एकाचे जेवढे नुकसान तेवढाच दुसऱ्याचा लाभ हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील तत्व कालबाह्य झाले असून एकाच्या लाभातून दुसऱ्याचा सुद्धा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होऊ शकतो हे सप्रमाण सिद्ध झाले आहे. असे डॉ. सिंग यांनी चीनच्या धोरणकर्त्यांना सांगितले होते २१ व्या शतकात भारत-चीन संबंधाचा नवा अध्याय सुरु झाल्यानंतर प्रथमच भारतीय नेतृत्वाने द्वि-पक्षीय संबंधाच्या दिशा आणि उद्देशाबद्दलपद्धतशीर मांडणी केली होती. डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात आतापर्यंत उल्लेखलेल्या द्विपक्षीय संबंधाच्या तिन्ही चौकटी एकाच वेळी कार्यरत होत्या पहिली चौकट – पाश्चिमात्य वर्चस्व झुगारण्याची, दुसरी चौकट – तिबेट व सीमाप्रश्नी एकमेकांशी संघर्ष करण्याची आणि तिसरी चौकट – एकमेकांच्या फायद्यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये देवाणघेवाण करण्याची (परिमल माया सुधाकर लेख २३ ऑक्टोबर २००९) अशा पद्धतीने डॉ.मनमोहन सिंग यांच्या चीन बरोबर अवलंबलेल्या परराष्ट्र धोरणानुसार भारत व चीन यांच्या परराष्ट्र संबंधात सहकार्य व मैत्रीचे पर्व सुरु झाले.

**भारत व चीन यांच्या परराष्ट्र धोरणातील सकारात्मक दृष्टीकोण :-**

- सीमा विवाद आणि काही मुद्द्यांवरील मतभेदामुळे जागतिक मंचावर उभ्या असलेल्या दोन देशांच्या त्यांच्या आर्थिक संबंधासाठी नवीन मानदंड स्थापित केले आहेत द्विपक्षीय व्यापार २००० मध्ये केवळ ३ अब्ज डॉलर्सवरून २०१२ मध्ये ७० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढला. डिसेंबर २०१० मध्ये चीनचे पंतप्रधान व्हेन जियाबाओ यांच्या भारतदौऱ्यादरम्यान दोन्ही बाजूनी २०१५ साली संयुक्तपणे द्विपक्षीय व्यापार लक्ष्य१०० अब्ज अमेरिकन डॉलर्स ठेवले होते आणि ताज्या अहवालात असे सूचित केले गेले आहे की हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे
- दीर्घकालीन दृष्टिकोन स्विकारून दोन्ही देशांनी आर्थिक मुद्द्यांवर समन्वय साधण्यासाठी आणि दारिद्र्य निर्मूलन आणि शाश्वत शहरीकरणाच्या निर्मितीमध्ये संबंधित विकासाचे अनुभव सामायिक करण्यासाठीधोरणात्मक आर्थिक संवाद सुरू केला आहे
- लष्करी क्षेत्रात आज आशियातील दोन महासत्ता आपल्या अव्वल लष्करी क्षेत्रामध्ये अधिकाधिक विश्वास निर्माण करण्यासाठी आणि संवाद अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या दोन देशांच्या संरक्षण मंत्र्यांनी अनेकदा भेट घेतली आहेआणि सैन्य-लष्करामधील संवाद वाढविण्यासाठी नवीन मार्ग शोधत आहेत
- भारत आणि चीनने गेल्या काही वर्षांमध्ये आशियातील दोन प्राचीन सभ्यता आणि उदयोन्मुख आशियाई महासत्ता यांच्यात संबंधांचे एक नवीन मॉडेल विकसित केले आहे या मॉडेलमध्ये भागीदारीच्या बहुपक्षीय दृष्टीकोनाची कल्पना केली गेली आहे. सीमा विवादांसारख्या जटिल मुद्द्यांना व्यापार आणि गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीत जवळील सहकार्यासारख्या द्विपक्षीय संबंधाच्या इतर महत्त्वपूर्ण बाबींवर परिणाम करण्यास परवानगी देत नाही यावेळी दोन्ही देशांनी विविध क्षेत्रांशी संबंधित असंख्य संवाद यंत्रणा स्थापन केल्या आहेत
- आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारत आणि चीनने अनेक मुद्द्यांवर युती केली आहे हवामान बदलावरील आंतरराष्ट्रीय चर्चेत त्यांचा समन्वय व सल्लामसलत विकासनशील देशांच्या हिताचे रक्षण करण्यात उपयुक्त ठरली आहे ब्रिक्स सारख्या बहुपक्षीय मंचामध्ये भारत आणि चीन, इराण आणि सिरियाच्या समस्या सोडवण्यासारख्या कठीण प्रश्नांचे निराकरण करण्यावर संवाद आणि मुत्सद्दीपणाद्वारे समान भाषा बोलताना आढळतात.

एकमेकांना आश्वासन देणारे सहकार्याचे हे चित्र समाधानकारक असले तरी भारत व चीन यांच्या परराष्ट्र धोरणात काही संवेदनशील मुद्दे योग्यप्रकारे हाताळले नाहीत तरपुढील काळात आव्हाने निर्माण होऊ शकतात.

**भारत व चीन यांच्या परराष्ट्र धोरणातील आव्हाने :-**

- सर्वप्रथम दोन्ही देशांनी सीमेवर शांतता वसहकार्य राखण्यास निश्चितच प्राधान्य दिले पाहिजे. भारताच्या दृष्टीकोनातून याला अत्यल्प महत्त्व आहे कारण सीमांकन केलेल्या सीमारेषाने निर्माण झालेली घुसखोरी संशयाला उत्तेजन देते या पार्श्वभूमीवर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या चीन दौऱ्या दरम्यान सीमा संरक्षण सहकार्य करारावर स्वाक्षरी करण्याचे चालू असलेले प्रयत्न हे गेमचेंजर असल्याचे सिद्ध होऊ शकते. सीमा संरक्षण कराराद्वारे वास्तविक नियंत्रण रेषेशी समांतर विद्यमान दहशतवाद विरोधी उपायांना कराराअंतर्गत एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्यामुळे घुसखोरीमुळेनिर्माण होणाऱ्या कोणत्याही संकटाला सामोरे जाण्यासाठी सीमा सुरक्षा दलांसारख्या अतिरिक्त उपाययोजनाही केल्या जातील.
- व्यापाराच्या असंतुलन विषयाच्या समस्येवर त्वरेने लक्ष देण्याची गरज आहे आगामी काळात होणाऱ्या चर्चेत चीन काही ठोस पावले उचलेल ज्यामुळे आर्थिक संबंधात काही प्रमाणात संतुलन निर्माण होईल, अशी भारताला आशा आहे. चीनने भारताच्या आयटी आणि फार्मा कंपन्याना प्रवेश दिल्यास त्याचा आर्थिक संबंधावर हळूहळू परिणाम होईल आर्थिक आघाडीवर काही सकारात्मक घडामोडी झाल्या आहेत. चीन भारतात गुंतवणूक वाढविण्यास तयार असल्याचे दिसते
- भारत आणि चीन यांनी पश्चिम आशिया, आफ्रिका आणि मध्य आशियावर सुरू केलेले उप-प्रादेशिक संवाद बळकट केले पाहिजे.

प्राचीन काळापासून भारत आणि चीनमधील मैत्री आधुनिक काळात अनेक अस्थिर काळातून गेली आहेभारत आणि चीनमधील सीमा विवाद आजही कायम आहेत. चीन आणि भारत यांच्यातील संबंधांमध्ये बरीच सुधारणा झाली असली तरी त्यांच्यातील समस्याचे निराकरण झालेल्या समस्या नव्याने उद्भवल्या आहेत. चीन आणि भारत यांच्यातील सर्वात मोठी समस्या म्हणजे सीमा विवाद आणि तिबेटच्या समस्येला चिनी सरकारने नेहमीच मोठे महत्त्व दिले आहे. यातून मार्ग काढत दोन्ही राष्ट्रांनी परराष्ट्र धोरणात शांततापूर्ण सहअस्तित्व आणि सह-समृद्धीचे एक नवीन मॉडेल तयार केले आहे. पण हे टिकवणे आवश्यक आहे.

**पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या परराष्ट्र धोरणाची फलश्रुती :-**

- आण्विक उत्तरदायित्वाचं विधेयक मंजूर करून घेण्यात अपयश आले.
- भारत व चीन यांच्या सीमेवर सैन्याच्या हालचालीसाठी आवश्यक साधन संपत्ती बाबत दिरंगाई
- अमेरिकेबरोबरचा नागरी अणुकरार पूर्णत्वास जाऊ शकलेला नाही.
- आसियान संघटनेबरोबर मुक्त व्यापार करार करण्यासंबंधीच्या चर्चेत प्रगती नाही.
- आर्थिक विकास ही भारताची प्राथमिकता आहे. शांतते शिवाय आर्थिक विकास शक्य नाही यामुळे परराष्ट्र धोरणात आक्रमता टाळली
- आर्थिक सहकार्यातून निर्माण होणाऱ्या परस्पर विश्वासामुळे राजकीय स्वरूपाचा प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे.
- चीन आणि पाकिस्तानबरोबरचा छोट्यात छोटा संघर्षही भारताच्या आर्थिक विकासात बाधा निर्माण करणारा आहे.
- संवाद, चर्चा, सहकार्य आणि भागीदारीच्या माध्यमातून इतर राष्ट्रांबरोबरचा संघर्षसोडविणे शक्य आहे.
- अमेरिकेकडून घनिष्ठ संरक्षण सहकाऱ्याचा दर्जा प्राप्त करून घेण्यात यश.
- अणुइंधन शस्त्रास्त्रे, संरक्षण साहित्य आणि उपकरणे रशियाकडून प्राप्त करून घेण्यासंबंधीयशस्वी करार .

**संदर्भसूची:**

१. दत्त वी .पी., (२००३), "बदलती दुनिया में भारत की विदेश निर्ती", हिन्दी माध्यम कार्यालय निदेशालय दिल्ली विश्व विधालय, दिल्ली.

२. देवळणकर शैलेंद्र (२०१४) ,"समकालीन जागतिक राजकारण ," विद्याबुक पब्लिशिंग, औरंगाबाद ,

३. गाडगीळ.ने .ज.,(१९९४) "नवभारताचे शिल्पकार", पुणे

४. पतंगे रमेश(२००४),संपादक ,, राष्ट्ररत्न अटलजी खंड १ मुंबई ,

५. *माथूर के" एम .व कामत पी .डी .कंडक्ट ऑफ इंडियाज फॉरिन पॉलिसी साऊथ एशियन पब्लिशर्स", नवी दिल्ली)१९९६ .*